**मराठी-वाङ्मय-मंडळ**

**'मराठी भाषा-संवर्धन पंधरवडा'**

**अहवाल**

**(शैक्षणिक वर्ष २०२४ -२०२५)**

**वारसा : भाषेचा आणि मूल्यसंस्कारांचा**

बुधवार, दिनांक २४ जुलै, २०२४ रोजी डी. जी. रुपारेल महाविद्यालयातील मराठी-वाङ्मय-मंडळातर्फे शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५मधील पहिला उपक्रम म्हणून 'वारसा: भाषेचा आणि मूल्यसंस्कारांचा' ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ह्या कार्यक्रमात ज्येष्ठ मराठी अभ्यासक आणि रामनारायण रुईया महाविद्यालयातील माजी मराठी-विभागप्रमुख प्रा. मीना गोखले, उपप्राचार्या विद्या पाटील, मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्त अनिता हमंद, कला शाखेच्या अधिष्ठाता व मराठी विभागप्रमुख डॉ. वैशाली जावळेकर, रुपारेल महाविद्यालयातील इतर अध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. ज्येष्ठ व्याकरणतज्ज्ञ प्रा. यास्मिन शेख ह्यांच्या शंभराव्या वाढदिवसानिमित्त प्रसारित केल्या गेलेल्या 'चिरतरुण यास्मिन बाई' ह्या मुलाखतीच्या ध्वनिचित्रफितीतून मराठी-साहित्य-संस्कृतीच्या वारशाच्या जतनाविषयीची यास्मिन बाईंची भूमिका समजून घेता आली. यास्मिन बाईंच्या जीवनकार्यातील भाषा-मूल्य-संचिताचा धागा समकालीन विद्यार्थ्यांशी जोडण्यासंबंधी प्रा. मीना गोखले ह्यांनी विचार मांडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृतीयवर्ष कला शाखेतील विद्यार्थिनी धनश्री राणे ह्या विद्यार्थिनीने केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी-वाङ्मय-मंडळाची विद्यार्थी-समन्वयक निर्जरा घोलप ह्या विद्यार्थिनीने केले. प्रास्ताविकानंतर प्रा. मीना गोखले ह्यांचा परिचय द्वितीयवर्ष कला शाखेतील विद्यार्थिनी पृथा राजिवडेकर ह्या विद्यार्थिनीने करून दिला. प्रा. मीना गोखले ह्यांचा सत्कार मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्त अनिता हमंद ह्यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर द्वितीयवर्ष कला शाखेतील विद्यार्थिनी दिशा ओक हिने प्रा. यास्मिन शेख ह्यांच्याविषयीच्या मानपत्राचे वाचन केले. कार्यक्रमाच्या समारोपाच्या वेळी तृतीयवर्ष कला शाखेतील विद्यार्थिनी अनुश्री नाईक व द्वितीयवर्ष कला शाखेतील विद्यार्थिनी गार्गी दवणे ह्यांनी प्रा. मीना गोखले ह्यांच्यासाठी तयार केलेली भेटवस्तू त्यांना देण्यात आली. द्वितीयवर्ष कला शाखेतील विद्यार्थिनी शांभवी वालावलकर हिने आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता केली.

**'नव्या क्षितिजावरचे नवे तारे आम्ही !'**

शुक्रवार, दिनांक २ ऑगस्ट, २०२४ रोजी डी. जी. रुपारेल महाविद्यालयातील २ विज्ञान ह्या सभागृहात स. ११:३० वाजता 'नव्या क्षितिजावरचे नवे तारे आम्ही!' हा मराठी-वाङ्मय-मंडळाचा शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५मधील दुसरा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या कविता गिते, रीना गोरे, कला शाखेच्या अधिष्ठाता आणि मराठी विभागप्रमुख डा ॅ. वैशाली जावळेकर, कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी-विभागप्रमुख दिलीप संध्यान, मराठी विभागातील अध्यापक डा ॅ. अनघा मांडवकर, इतर अध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या कविता गिते ताई (बालविकास अधिकारी, गट ब, महाराष्ट्र शासन) आणि रीना गोरे ताई (ज्येष्ठ विश्लेषक, ॲक्सेंचर, आणि वकील) ह्या रुपारेल महाविद्यालयातील मराठी विभागाच्या माजी विद्यार्थिनी असून त्यांनी मिळवलेल्या यशाचे कौतुक करण्याचा आणि त्यांच्या यशाचे रहस्य जाणून घेण्याचा उद्देश सदर कार्यक्रमामागे होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि संवादकांची ओळख ह्या जबाबदाऱ्या निर्जरा घोलप ह्या मराठी-वाङ्मय-मंडळाच्या विद्यार्थी-समन्वयकाने नेटकेपणाने पार पाडल्या. प्रमुख पाहुण्यांना कला शाखेच्या अधिष्ठाता आणि मराठी विभागप्रमुख डा ॅ. वैशाली जावळेकर, कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी-विभागप्रमुख दिलीप संध्यान ह्यांच्या हस्ते फुलझाडाची भेट देण्यात आली.

कविता गिते ताईने तिच्या राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील अनुभवांचे काही किस्से सांगितले. ह्या अनुभवांमधून तिने मेहनत, सातत्य, जिद्द, चिकाटी, मानसिक आरोग्य ह्या आवश्यक बाबींविषयी भाष्य केले. त्यानंतर रीना गोरे ताईने स्वतःच्या कार्यप्रवासाबद्दल तसेच विविध क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या मराठीसंबंधित नवनवीन संधींबद्दल प्रेक्षकांशी संवाद साधला. प्रेक्षकांच्या प्रश्नांनाही त्यांनी मोकळेपणाने सविस्तर उत्तरे दिली.

कार्यक्रमानंतर, पदव्युत्तर विज्ञान शाखेची विद्यार्थिनी तन्वी गुंडये आणि द्वितीयवर्ष कला शाखेची विद्यार्थिनी पृथा राजिवडेकर ह्यांनी तयार केलेली भेटवस्तू प्रमुख पाहुण्यांना देण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी त्रिशा दळवी ह्या द्वितीयवर्ष कला शाखेच्या विद्यार्थिनीने उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

**श्रवणीय श्रावण**

बुधवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०२४ रोजी डी. जी. रुपारेल महाविद्यालयातील २ विज्ञान ह्या सभागृहात दु. ३ वाजता 'श्रवणीय श्रावण' हा कार्यक्रम मराठी वाङ्मय मंडळाद्वारे आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात डी. जी. रुपारेल महाविद्यालयाच्या उपप्राचार्य, कला शाखेच्या अधिष्ठाता आणि मराठी विभाग प्रमुख डॉ. वैशाली जावळेकर, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य रेखा गोहिल, कनिष्ठ महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. दिलीप संध्यान, तसेच मराठी विभाग आणि इतर विभागातील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.
श्रावण महिना आणि त्यात येणारे सण-उत्सव, पाऊस आणि प्रेम अशा विविध विषय घेऊन विद्यार्थ्यांनी स्वरचित आणि इतर कविता सादर केल्या.
कार्यक्रमात 'आचार्य अत्रे वक्तृत्व स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालयातील ऋतिका भोसले आणि सस्मिता कोरडे यांना यश प्राप्त झाल्यामुळे त्या दोघींचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांबरोबर काही प्राध्यापकांनी सुद्धा कविता सादर केल्या. कार्यक्रमाचा शेवट तृतीयवर्ष कला शाखेतील देव कोठारे या विद्यार्थ्याने सर्वांचे आभार मानून केला.

**शोध युवाप्रतिभेचा**

शनिवार, दिनांक १८ जानेवारी, २०२५ रोजी, डी. जी. रुपारेल महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळ आणि महाराष्ट्र टाइम्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'शोध युवप्रतिभेचा' हा कार्यक्रम रुपांगणात आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात प्रमुख

पाहुणे युवकवी आदित्य दवणे, महाराष्ट्र टाइम्समधून रोहन टिल्लू व सहकारी, विश्वस्त अनिता हमंद, प्रभारी प्राचार्य डॉ. दिलीप मस्के सर, उपप्राचार्य कला शाखेच्या अधिष्ठाता आणि मराठी विभाग प्रमुख डॉ. वैशाली जावळेकर, इतर विभागातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभदा साळगावकर ह्या तृतीयवर्ष कला शाखेच्या विद्यार्थिनीने केले. विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वरचित कथा, कविता सादर करण्यासाठी महाराष्ट्र टाइम्सद्वारे ही स्पर्धा आयोजित केली होती. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. सर्व विद्यार्थ्यांनी आपली स्वरचित कथा, कविता सादर केल्या व त्याचे परीक्षण प्रमुख पाहुणे आदित्य दवणे आणि रुपारेल महाविद्यालयातील प्रा. संदीप कदम यांनी केले.

या स्पर्धेत एकूण ३० विद्यार्थी सहभागी झाले होते आणि त्यातून चार विद्यार्थ्यांना विजेतेपद मिळाले.

प्रथम क्रमांक :- भूमिका जेकटे (प्रथम वर्ष कला शाखा)

द्वितीय क्रमांक :- ईशान अलोणी (तृतीय वर्ष कला शाखा)

उत्तेजनार्थ क्रमांक :- ईशा चव्हाण (प्रथम वर्ष कला शाखा) व शांभवी वालावलकर (द्वितीय वर्ष कला शाखा)

कार्यक्रमाच्या शेवटी आदित्य दवणे आणि रोहन टिल्लू या प्रमुख पाहुण्यांनी आपल्या स्वरचित कविता सादर केल्या. बक्षीस वितरण समारंभ पार पडल्यानंतर तृतीय वर्ष कला शाखेच्या मानसी नाटभंजन ह्या विद्यार्थिनीने सगळ्यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

**स्वरचित काव्यस्पर्धा**

दरवर्षीप्रमाणे ह्या ही वर्षी मराठी वाङ्मय मंडळाने मराठी भाषासंवर्धन पंधरवड्यानिमित्ताने स्व-रचित मराठी काव्य स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेचा कालावधी १४ जानेवारी, २०२५ ते २८ जानेवारी, २०२५ हा होता. ह्या स्पर्धेसाठी ३२ प्रतिसाद आले होते. सदर स्पर्धेचे परीक्षण रुपारेल महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी अस्मिता वांद्रे हिने केले. २७ फेब्रुवारी २०२५ मराठी गौरवदिनानिमित्त स्व-रचित मराठी काव्यस्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले.

निकाल :

प्रथम क्रमांक

- देव कोठारे

कवितेचे नाव : एक दिवसीय

इयत्ता : तृतीयवर्ष कला शाखा

- द्वितीय क्रमांक

ईशा चव्हाण

कवितेचे नाव : संघर्ष ग्रामीण युवांचा

इयत्ता : प्रथमवर्ष कला शाखा

- तृतीय क्रमांक

अर्णव चव्हाण

कवितेचे नाव : तुला कळणार नाही

इयत्ता : तृतीयवर्ष कला शाखा

- उत्तेजनार्थ

शांभवी वालावलकर

कवितेचे नाव : तिचं ते जगणं

इयत्ता : द्वितीयवर्ष कला शाखा

**पथनाट्य - 'माय मराठी, अभिजात मराठी'**

शुक्रवार, दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी डी. जी. रुपारेल महाविद्यालयातील रुपांगणात सकाळी ११:०० वाजता 'पथनाट्य - माय मराठी, अभिजात मराठी !' मराठी वाङ्मय मंडळाद्वारे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमासाठी रुपारेल महाविद्यालयाच्या विश्वस्त प्रा. अनिता हमंद, प्रभारी प्राचार्य डॉ. दिलीप मस्के, उपप्राचार्य आणि विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. कृष्णकांत वाघमोडे, उपप्राचार्य कला शाखेच्या अधिष्ठाता आणि मराठी विभाग प्रमुख डॉ. वैशाली जावळेकर हे सर्व उपस्थित होते. तसेच कार्यालयातील प्रबंधक मोहन लोंढे व इतर विभागातील शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथमवर्ष कला शाखेच्या विद्यार्थिनी चिन्मयी डोळस हिने केली. मराठी भाषा पूर्वीपासून कशी समृद्ध आहे आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला, या विषयावर हे पथनाट्य बसवण्यात होते. पथनाट्याची संहिता आणि दिग्दर्शन मराठी विभागाचे प्रा. निखिल भागडे यांनी केले होते. आणि सहभागी सर्व विद्यार्थ्यांनी खूप उत्तम रित्या पथनाट्य सादर केले. कार्यक्रमात उपस्थित सर्व शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. कार्यक्रमाची सांगता प्रथमवर्ष कला शाखेची विद्यार्थिनी वैष्णवी कदम हिने सर्व उपस्थितांचे आभार मानून केली.

**आठवणीतले दळवी**

शनिवार, दिनांक २५ जानेवारी, २०२५ रोजी डी. जी. रुपारेल महाविद्यालयातील २ विज्ञान सभागृहात दु. ३ वाजता मराठी वाङ्मय मंडळाने आयोजित केलेला मराठी संवर्धन पंधरवड्यातला 'आठवणीतले दळवी' हा चौथा कार्यक्रम होय. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख प्रेक्षकवर्ग म्हणून ज्येष्ठ नागरिकांस बोलावण्यात आले होते. कार्यक्रमास मराठी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. अनघा मांडवकर तसेच इतर विभागाचे अध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात द्वितीय वर्ष कला शाखेच्या विद्यार्थिनी पृथा आणि शांभवी यांनी सर्वांचे स्वागत करून आणि कार्यक्रमाची प्रस्तावना प्रेक्षकांसमोर मांडून केली. प्रस्तावने नंतर जयंत दळवींच्या जीवनप्रवासाची माहिती सांगण्यात आली. या नंतर दळवींच्या साहित्यावर आधारित सादरीकरणे सादर झाली. यात त्यांनी लिहिलेल्या कथा, कादंबरी आणि नाटकांमधील काही अंशाचे अभिवाचन करून दाखवण्यात आले. तसेच तृतीय वर्ष कला शाखेचा विद्यार्थी अर्णव चव्हाण याने दळवींना लिहिलेल्या स्व-लिखित पत्राचे वाचन करून दाखवले. कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात ज्येष्ठ नागरिकांनी त्यांचे दळवींसोबतचे काही अनुभव आणि कार्यक्रमाविषयीचे मनोगत मांडले. कार्यक्रमाची सांगता मराठी वाङ्मय मंडळाची विद्यार्थी समन्वयक निर्जरा घोलप हिने सर्वांचे आभार मानत केली.

**ग्रंथप्रदर्शन आणि उद्घाटन**

मराठी वाङ्मय मंडळाने आयोजित केलेल्या मराठी-भाषासंवर्धन पंधरवड्यातील कार्यक्रमांचे उद्घाटन दि. १४ जानेवारी, २०२५.(मंगळवार.) सकाळी ११:३० वाजता ग्रंथालयात, ‘ग्रंथप्रदर्शन’ मांडून करण्यात आले. ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन रुपारेलचे प्रभारी प्राचार्य डॉ. दिलीप मस्के सर यांच्या हातून केले गेले. ग्रंथप्रदर्शनाच विषय ‘जयवंत दळवी यांचे साहित्य आणि मराठी ’ असा होता.

प्रदर्शनाची सुरुवात स्वरसाधना (सांस्कृतिक) गटातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र गीत सादर करून केली. ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी वाङ्मय मंडळची समन्वयक निर्जरा घोलप हिने केले. सदर कार्यक्रमाला रूपारेलच्या विश्वस्त प्रा. अनिता हमंद, प्रभारी प्राचार्य डॉ. दिलीप मस्के, उपप्राचार्य आणि विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. कृष्णकांत वाघमोडे, उपप्राचार्य कला शाखेच्या अधिष्ठाता आणि मराठी विभाग-प्रमुख डॉ. वैशाली जावळेकर, ग्रंथालय विभाग-प्रमुख अरविंद गणवीर तसेच ग्रंथालयातील सर्व सहकारी आणि इतर विभागातील प्राध्यापकही उपस्थित होते.

कार्यक्रमात मराठी भाषेला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा आणि मराठी भाषेबद्दल सर्व शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच प्रा. डॉ. वैशाली जावळेकर यांनी कथेचं वाचन केलं.

प्रदर्शनाच्या कार्यक्रमाची सांगता प्रथमवर्ष कला शाखेची विद्यार्थिनी वैभवी पोखरणकर हिने आभार मानून केली. हे ग्रंथप्रदर्शन दि. १४ जानेवारी, २०२५ ते २८ जानेवारी, २०२५ ह्यादिवसांत स. ११:३० ते संध्या. ४:०० वाजता विद्यार्थी तसेच शिक्षकांसाठी खुले होते.

**'वारसा' आंतरमहाविद्यालयीन स्पर्धामहोत्सव**

मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, पुणे संचालित डी. जी. रुपारेल कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळाने दिनांक १२ व १३ फेब्रुवारी, २०२५ रोजी 'वारसा-२०२५' या आंतर महाविद्यालयीन स्पर्धामहोत्सवाचे आयोजन केले होते. मायमराठीला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा आणि डॉ. ताराबाई भवाळकर यांची अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी झालेली निवड लक्षात घेऊन, यंदाच्या स्पर्धामहोत्सवासाठी 'मराठी लोकवाङ्मय ही संकल्पना निवडण्यात आली होती. म्हणूनच, लोककला-विश्वातील प्रख्यात कलाकार-अभ्यासक आणि मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे विभागप्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे यांना उद्घाटन सोहळ्यासाठी आमंत्रित केले होते. या महोत्सवाचे मुख्य प्रायोजक 'बाबुराव शामराव जोशी चॅरिटेबल ट्रस्ट' होते. तसेच, 'ओशन फिल्म कंपनी', 'बेडेकर', 'समीप सावंत फाउंडेशन', 'श्री कौशल इनामदार' हे सर्व उपक्रम साहाय्यक प्रायोजक होते. 'ग्रंथाली प्रकाशन' आणि 'आय. टी. एम. आय. डी. एम.

इंस्टिट्यूट' हे भेटवस्तू प्रायोजक होते. 'महाराष्ट्र टाइम्स' माध्यम प्रायोजक, तर 'रत्न मराठी मीडिया' नवमाध्यम प्रायोजक होते. तसेच, 'सुलोचना स्टेशनरी हे फलक प्रायोजक होते. 'केपर जेवेल्स', कॉ ड्रीप' आणि 'अश्विनी राजीवडेकर' हे स्टॉल-संयोजक होते.

मायमराठीच्या संवर्धनाचा वसा चालवू पाहणाऱ्या या महोत्सवात मराठी लोकवाङ्मय या संकल्पनेवर आधारित एकूण तेरा स्पर्धा आयोजित केल्या गेल्या होत्या. 'लोकवाङ्मय म्हणजे काय रे भाऊ !?' (इन्स्टाग्राम-रीळ) आणि 'लोकसंस्कृतीचे शिलेदार' (छायाचित्रण) या स्पर्धांचे प्रातिभासिक माध्यमात आयोजन करण्यात आले. पहिल्या दिवशी 'लोक्स' पर्यंत 'लोक' नेऊ या (नाटिका), 'दृश्यात वाच माझ्या तू भावार्थ या म्हणीचे!' (म्हणीवर आधारित चित्रकृती व कविता), 'माझा खेळ मांडू दे !' (मांडणशिल्प), 'आणि ग्रंथोपजीविये…' (अनुदिनी-लेखन), 'संचिताला चढवू स्वरसाज नवा ?' (एकल आणि सांघिक लोकसंगीत) अशा पाच स्पर्धा आयोजित केल्या गेल्या. तर दुसऱ्या दिवशी पत्रासकारण की ! (पत्रलेखन), 'तुला बुरगुंडा होईल!' (भारूड), 'बोलू काही'… (वक्तृत्व), 'कहाणी बिनशब्दांची…' (चित्रकथी), 'संचिताचे भान घडवी वर्तमान छान !' (प्रश्नमंजूषा) आणि 'नाचू लोकसंगीताच्या रंगी' (लोकनृत्य) अशा सहा स्पर्धा आयोजित केल्या गेल्या. रुपारेलमधील शिक्षक आणि विविध क्षेत्रांत यशस्वी झालेले रुपारेलचे माजी विद्यार्थी मिळून चोवीस परीक्षकांनी या स्पर्धांचे परीक्षण केले. या स्पर्धांमध्ये एकूण दहा महाविद्यालयांनी सहभाग घेतला, जवळजवळ अडीचशे स्पर्धकांनी भाग घेतला.

'वारसा-२०२५'च्या बक्षीसवितरण सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ अभ्यासक आणि पत्रकार डॉ. मुकुंद कुळे आणि सुप्रसिद्ध अभिनेत्री आणि मराठी माध्यमाच्या शाळांच्या चळवळीतील कार्यकर्त्या चिन्मयी सुमीत हे दोघे उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून रुपारेल महाविद्यालयातील रसायनशास्त्र-विभागप्रमुख आणि ज्येष्ठ अध्यापक प्रा. संजय माहीमकर आणि तसेच भौतिकशास्त्र-विभागप्रमुख डॉ. मुग्धा पत्की उपस्थित होते. मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्त प्रा. अनिता हमंद, डी. जी. रुपारेल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. दिलीप मस्के, उपप्राचार्य आणि विज्ञान शाखा अधिष्ठाता प्रा. डॉ. कृष्णकांत वाघमोडे, तसेच उपप्राचार्य, कला शाखेच्या अधिष्ठाता आणि मराठी विभागप्रमुख डॉ. वैशाली जावळेकर, परीक्षक, प्रायोजक, मराठी विभागातील साहाय्यक प्राध्यापक डॉ. अनघा मांडवकर, प्रा. निखिल बागडे, अन्य विभागांतील व अन्य महाविद्यालयांतील अध्यापक, स्पर्धक विद्यार्थी यांच्या उत्साही उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

माटुंग्याचे रामनारायण रुईया महाविद्यालय हे महोत्सवातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालय ठरले. माटुंग्याच्या आर. ए. पोद्दार महाविद्यालयाने सर्वोत्कृष्ट महाविद्यालय द्वितीय पारितोषिक आणि सर्वोत्कृष्ट जनसंपर्क-उपक्रम ही पारितोषिके पटकावली. सर्वोत्कृष्ट महाविद्यालय-तृतीय पारितोषिक है उल्हासनगरच्या सी. एच. एम. महाविद्यालयाने पटकावले, तसेच वरद नंदगेम आणि आभा बापट यांनी सर्वोत्कृष्ट संघ-प्रतिनिधी व सह-प्रतिनिधी हे पारितोषिक जिंकले. तर महोत्सवातील एकंदर सर्वाधिक सहभागाचे पारितोषिक हे मुलुंडच्या विनायक गणेश वझे-केळकर महाविद्यालयाला मिळाले.

एकंदरीत रुपारेल महाविद्यालयाच्या मराठी वाङ्मय मंडळाद्वारे आयोजित वारसा-२०२५' हा आंतरमहाविद्यालयीन अभ्यासपूरक स्पर्धामहोत्सव उत्कृष्ट प्रतिसादासह मोठ्या दिमाखात पार पडला.

**मराठी भाषा गौरव दिन**

२७ फेब्रुवरी हा दिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज ह्यांना अभिवादन म्हणून त्यांचा वाढदिवस, मराठी भाषा गौरव दिन म्हणून घोषित करण्यात आला. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त राज्यभरात विविध शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी डी.

जी. रुपारेल महाविद्यालय, मराठी भाषा गौरव दिनानिमित्त गुरुवार दि. २७ फेब्रुवरी २०२५ रोजी दोन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यातील पहिला कार्यक्रम हा ग्रंथदिंडी' चा होता. ही ग्रंथदिंडी महाविद्यालयाच्या ग्रंथालय, कार्यालय आणि मराठी वाङ्मय मंडळाच्या संयुक्त विद्यमाने पार पडली. ही ग्रंथदिंडी सकाळी सुमारे १० वाजता कला शाखेच्या इमारतीपासून सुरू झाली. पुढे पूर्ण महाविद्यालयात ग्रंथदिंडी मिरवली आणि महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ठेवण्यात आली. या पूर्ण फेरीत महाविद्यालयाच्या प्रत्येक सदस्याचे योगदान होते शिक्षक विद्यार्थी ग्रंथालय आणि कार्यालय कर्मचारी ह्या उत्सवात सामील होते. परीक्षा विभागाचे कर्मचारी श्री. रवी पंडित ह्यांनी आपल्या मधुर पण खणखणीत गायनाने ह्या ग्रंथदिंडीची शान वाढवली. संतांच्या ओव्या आणि दिग्गजांनी रचलेल्या सुंदर गाण्यांसह काहींनी लेझिम खेळण्याचासुद्धा आस्वाद घेतला. ह्या ग्रंथदिंडीमध्ये महाविद्यालयाच्या विश्वस्त अनिता हमंद बाई, आपले प्रभारी प्राचार्य डॉ. दिलीप मरके सर, कला शाखेच्या अधिष्ठाता, मराठी विभागप्रमुख आणि उपप्राचार्य डॉ. वैशाली जावळेकर बाई आणि विज्ञान शाखेचे अधिष्ठाता आणि उपप्राचार्य डॉ. कृष्णकांत वाघमोडे सर ग्रंथालय प्रमुख आणि इतिहास विभागप्रमुख अरविंद गणवीर सर, हे सगळे उपस्थित होते. ग्रंथालयात कुसुमाग्रजांच्या जन्मदिनाच्यानिमित्ताने त्यांच्या साहित्याचे प्रदर्शन लावण्यात आले होते. या पुढील कार्यक्रम ग्रंथालय, कार्यालय आणि मराठी वाङ्मय मंडळाच्या संयुक्त विद्यमाने २ विज्ञान मध्ये आयोजित करण्यात आला. ह्या कार्यक्रमाच्या सुरुवातीला नुकतंच झालेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर ह्यांच्या अध्यक्षीय भाषणाच्या अंशाचे प्रसारण द्वानिचित्रफितीद्वारे दाखवण्यात आले. आपल्या महाविद्यालयाचा तृतीय वर्षाचा विद्यार्थी अर्णव चव्हाण ह्याने ते तयार केले होते. त्यानंतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी विशेष मुक्तसूत्र आयोजित करण्यात आले ज्यामध्ये कुसुमाग्रजांच्या साहित्याचे सादरीकरण झाले. ह्यात बऱ्याच शिक्षकांनी सहभाग घेतला. ह्या कार्यक्रमाचा शेवट मराठी भाषा पंधरवड्यात आयोजित केलेल्या स्वरचित काव्यस्पर्धेच्या वितरण सोहळ्याने झाली. ह्यात पहिले बक्षीस देव कोठारेला मिळाले, दुसरे ईशा चव्हाण, तिसरे अर्णव चव्हाणला मिळाले आणि उत्तेजनार्थ शांभवी वालावलकरला मिळाले. ह्या विजेत्यांनी आपल्या कविता मंचावर सादर केल्या. अशा प्रकारे मराठी वाङ्मय मंडळाच्या ह्या वर्षाच्या शेवटच्या कार्यक्रमाची सांगता तृतीयवर्ष कला शाखेचा विद्यार्थी आमोद भिडे याने सर्वांचे आभार मानून केली.

**डॉ. वैशाली जावळेकर.**
**उपप्राचार्य, अधिष्ठाता कला शाखा, मराठी विभागप्रमुख**